**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०१**

नगरसचिव कार्यालय

दिनांक : २३/०४/२०१८

प्रति,

मा. --------------------------------------

स्थायी समिती, सदस्य

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती **सभा क्र -०१ गुरूवार दि.२६/०४/२०१८ रोजी सकाळी १०.३० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृहात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-

प्र. नगरसचिव,

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये.

अहमदनगर महानगरपालिका

**गुरूवार दिनांक- २६/०४/२०१८ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| १ | मा.स्थायी समिती सभेच्या दिनांक २७/०३/२०१८ अन्वये तहकुब करण्यात आलेले मा.स्थायी समिती सभा क्र.- ०७ बुधवार दिनांक १७/१२/२०१६ , सभा क्र. ०८ दिनांक १६/२/२०१७,सभा क्र.०९ दि.१४/०३/२०१७ , सभा क्र.०१ दि.१०/०४/२०१७, सभा क्र. ०२ दि.०३/०६/२०१७ , सभा क्र. ०३ दि.०३/०७/२०१७ ,सभा क्र.०४ दि.२८/०८/२०१७ व सभा क्र.५ दि.२६/९/२०१७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| २ | अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी गायकवाड अरविंद शामराव यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ३ | अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाकरिता अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी लागणारे हार्डवेअर साहित्य खरेदी करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये माहितीबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ४ | मा. केंद्रशासित 'अमृत' योजना अभियाना अंतर्गत भुयारी गटार योजना ई - निविदा क्र.१६५४ चे व्यापारी लिफाफया मधील प्राप्त दर व ठेकेदाराचे वाटाघाटी नंतरचे अंतीम देकाराबबत महाराष्ट्र जीवन प्राधिकारणाचे प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ५ | मालमत्ता धारक श्री. विवेक रामलिंग आकुबत्तीन , रा. हौसीग सोसायटी यांना सावेडी प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.७८,बील क्र.१८४ मालमत्तेमध्ये नळजोड नसल्याने नळजोड पोटी आकारलेली पाणीपटटी कराची नळ कनेक्शन नसतांना आकरण्यांत आलेली रक्कम व शास्ती निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

सही /-

प्र.नगरसचिव,

अहमदनगर महानगरपालिका

**सोबत- १]** विषय क्रमांक- १ - मा.स्थायी समिती सभा क्र.- ०७ बुधवार दिनांक १७/१२/२०१६ , सभा क्र. ०८ दिनांक १६/२/२०१७,सभा क्र.०९ दि.१४/०३/२०१७ , सभा क्र.०१ दि.१०/०४/२०१७, सभा क्र. ०२ दि.०३/०६/२०१७ , सभा क्र. ०३ दि.०३/०७/२०१७ ,सभा क्र.०४ दि.२८/०८/२०१७ व सभा क्र.५ दि.२६/९/२०१७ रोजीच्या सभेचे इतिवृत्ताची प्रत

**२]** विषय क्रमांक- २ ते ५ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०१**

विषय क्रमांक- १ गुरूवार दि.२६/०४/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभेच्या दिनांक २७/०३/२०१८ अन्वये तहकुब करण्यात आलेले मा.स्थायी समिती सभा क्र.- ०७ बुधवार दिनांक १७/१२/२०१६ , सभा क्र. ०८ दिनांक १६/२/२०१७,सभा क्र.०९ दि.१४/०३/२०१७ , सभा क्र.०१ दि.१०/०४/२०१७, सभा क्र. ०२ दि.०३/०६/२०१७ , सभा क्र. ०३ दि.०३/०७/२०१७ ,सभा क्र.०४ दि.२८/०८/२०१७ व सभा क्र.५ दि.२६/९/२०१७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकुर :-** मा.स्थायी समिती सभा क्र.- ०७ दिनांक १७/१२/२०१६ , सभा क्र. ०८ दिनांक १६/२/२०१७,सभा क्र.०९ दि.१४/०३/२०१७ , सभा क्र.०१ दि.१०/०४/२०१७, सभा क्र. ०२ दि.०३/०६/२०१७ , सभा क्र. ०३ दि.०३/०७/२०१७ ,सभा क्र.०४ दि.२८/०८/२०१७ व सभा क्र.५ दि.२६/९/२०१७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- विषयाचे वाचन करण्यात यावे.

मागील सभेच्या इतिवृत्ताचे वाचन सुरू करण्यात आले.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- एक एका इतिवृत्त वाचा प्रत्येक विषयावर आम्हाला चर्चा करावयाची आहे.मागील इतीवृत्त अदयाप कायम का झाले नाही ? सभेमध्ये जबाबदार अधिकारी पाहिजे.मा.आयुक्त यांना सभेमध्ये बोलवा.दोन्ही प्रभारी उपायुक्त हे जबाबदार अधिकारी होवू शकत नाही.

मा.श्री.संजय शेंडगे :- सभेमध्ये दोन उपायुक्त आहेत सभा सुरू करण्यात यावी.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- दोनही उपायुक्त हे प्रभारी आहेत आयुक्तांना बोलवा

मा.श्री.मुदस्सर शेख :- मागील इतीवृत्त कायम केले नाही.मा.आयुक्तांना बोलवा.जबाबदार अधिकारी पाहिजेत.इतीवृत्त कायम का केले नाही ? या बाबतचे नियम सांगा.

मा.नगरसचिव श्री.तडवी :- इतीवृत्त कायम करण्याच्या विषयाबाबत वेळोवेळी मा.नगरसचिव यांचेकडेस प्राप्त झालेले विषय व इतिवृत्त कायम करणे बाबत चे सर्व विषय मा.सभापती तथा पिठासीन अधिकारी यांच्या कडे सादर केले जातात.त्यानुसार सभापती यादी मधील विषय निर्णय घेणे कामी सभेचे तारीख व वेळ देवून स्थायी समिती सभा काढणे बाबत आदेशीत करतात.इतिवृत्ता बाबत वेळोवेळी यादी दिलेली आहे.सदरचे विषय पिठासीन अधिकारी यांनी न घेतल्याने प्रलंबित आहेत.

मा.श्री.सागर बोरूडे :- सगळे विषय मंजूर करण्यात यावे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- असे विषय मंजूर होत नाहीत.विषय वाचल्यानंतर त्यावर चर्चा होईल,कुठलीही चर्चा न होता विषय मंजूर होत नाहीत.चर्चा न होता विषय कसे काय मंजूर होतात.

मा.सभापती साहेब :- बहुमताने सर्व विषय मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभेच्या दिनांक २७/०३/२०१८ अन्वये तहकुब करण्यात आलेले मा.स्थायी समिती सभा क्र.- ०७ बुधवार दिनांक १७/१२/२०१६ , सभा क्र. ०८ दिनांक १६/२/२०१७,सभा क्र.०९ दि.१४/०३/२०१७ , सभा क्र.०१ दि.१०/०४/२०१७, सभा क्र. ०२ दि.०३/०६/२०१७ , सभा क्र. ०३ दि.०३/०७/२०१७ ,सभा क्र.०४ दि.२८/०८/२०१७ व सभा क्र.५ दि.२६/९/२०१७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेस हि सभा मान्यता देत आहे.

मा.सदस्य.१) श्री.बाळासाहेब बोराटे २) मा.श्री.मुदस्सर शेख ३) मा.श्री.संजय लोंढे या सदस्यांचा विरोध नोंदवून घेण्यात येत आहे.सभागृहात सभेस उपस्थितीत १२ सदस्यांपैकी ९ अनुकुल व ३ विरुध्द अशा बहुमताने ऑफिस रिपोर्ट मंजूर.नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.अनिता राठोड सही /-

अनुमोदक :- मा.सौ.उषा नलवडे सही /-

ठराव बहुमताने मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०१**

विषय क्रमांक- २ गुरूवार दि.२६/०४/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी गायकवाड अरविंद शामराव यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**संदर्भ : -** इलेक्ट्रीक विभाग यांचेकडील जा.क्र. इलेक्ट्रीक विभाग ११५० दि.२३/२/२०१८ चा प्रस्ताव.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये की, इलेक्ट्रीक विभाग यांनी त्यांचेकडील जा. क्र. इलेक्ट्रीक ११५० दि. २३/०२/२०१८अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " इलेक्ट्रीक विभागा करीता करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी गायकवाड अरविंद शामराव यांची अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि. ०७/०८/२०१७ ते ०६/०२/२०१८ अखेर असुन सदरची मुदत ही दि. ०७ / ०२ / २०१८ रोजी पासुन समाप्त होत असल्याने त्यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणे बाबत." सुचित केलेले आहे.

गायकवाड अरविंद शामराव यांची सद्यस्थितीमध्ये जा. क्र. आस्था. करारबध्द नेमणुक २७४३ दि. ०२/११/२०१७अन्वये इलेक्ट्रीक विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी रु. ९,५००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्तीप्रमाणे तांत्रिक खंड देवून दि.०७/०८/२०१७पासुन सहामहिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सदरची मुदत ही दि.०७/०२/२०१८रोजी पासुन समाप्त होणार आहे.

तरी वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी गायकवाड अरविंद शामराव यांना तीन दिवसांचा तंत्रिक खंड देवुन दि. १०/०२/२०१८ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे रुपये ९,५००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे कामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा. मुख्य लेखा अधिकारी व मा. मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय घेवुन सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त यांची स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिाप्राय की,A मान्य

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- विषयाचे वाचन करण्यात यावे.

मागील सभेच्या इतिवृत्ताचे वाचन सुरू करण्यात आले.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- एक एका इतिवृत्त वाचा प्रत्येक विषयावर आम्हाला चर्चा करावयाची आहे.मागील इतीवृत्त अदयाप कायम का झाले नाही ? सभेमध्ये जबाबदार अधिकारी पाहिजे.मा.आयुक्त यांना सभेमध्ये बोलवा.दोन्ही प्रभारी उपायुक्त हे जबाबदार अधिकारी होवू शकत नाही.

मा.श्री.संजय शेंडगे :- सभेमध्ये दोन उपायुक्त आहेत सभा सुरू करण्यात यावी.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- दोनही उपायुक्त हे प्रभारी आहेत आयुक्तांना बोलवा

मा.श्री.मुदस्सर शेख :- मागील इतीवृत्त कायम केले नाही.मा.आयुक्तांना बोलवा.जबाबदार अधिकारी पाहिजेत.इतीवृत्त कायम का केले नाही ? या बाबतचे नियम सांगा.

मा.नगरसचिव श्री.तडवी :- इतीवृत्त कायम करण्याच्या विषयाबाबत वेळोवेळी मा.नगरसचिव यांचेकडेस प्राप्त झालेले विषय व इतिवृत्त कायम करणे बाबत चे सर्व विषय मा.सभापती तथा पिठासीन अधिकारी यांच्या कडे सादर केले जातात.त्यानुसार सभापती यादी मधील विषय निर्णय घेणे कामी सभेचे तारीख व वेळ देवून स्थायी समिती सभा काढणे बाबत आदेशीत करतात.इतिवृत्ता बाबत वेळोवेळी यादी दिलेली आहे.सदरचे विषय पिठासीन अधिकारी यांनी न घेतल्याने प्रलंबित आहेत.

मा.श्री.सागर बोरूडे :- सगळे विषय मंजूर करण्यात यावे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- असे विषय मंजूर होत नाहीत.विषय वाचल्यानंतर त्यावर चर्चा होईल,कुठलीही चर्चा न होता विषय मंजूर होत नाहीत.चर्चा न होता विषय कसे काय मंजूर होतात.

मा.सभापती साहेब :- बहुमताने सर्व विषय मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी गायकवाड अरविंद शामराव यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतच्या ऑफिस रिपोर्टास हि सभा मान्यता देत आहे.

मा.सदस्य.१) श्री.बाळासाहेब बोराटे २) मा.श्री.मुदस्सर शेख ३) मा.श्री.संजय लोंढे या सदस्यांचा विरोध नोंदवून घेण्यात येत आहे.सभागृहात सभेस उपस्थितीत १२ सदस्यांपैकी ९ अनुकुल व ३ विरुध्द अशा बहुमताने ऑफिस रिपोर्ट मंजूर.नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.संजय शेंडगे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.बाबासाहेब वाकळे सही /-

ठराव बहुमताने मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०१**

विषय क्रमांक- ३ गुरूवार दि.२६/०४/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाकरिता अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी लागणारे हार्डवेअर साहित्य खरेदी करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये माहितीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका स्टोअर विभाग

**<u>संदर्भ :-</u>** ई-निविदा क्र.१५५५.

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन विनंती रिपोर्ट की,सन.२०१७-२०१८ या आर्थिक वर्षा करिता अहमदनगर महानगरपालिकेस हार्डवेअर साहित्य पूरवठा करणेकामी मा.महाराष्ट्र शासन उदयोग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांकःभांखस - २०१४/ प्र.क्र.८२/ भाग-III/ उदयोग-४ मादाम कामारोड,हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय,मुंबई - ४०००३२ दिनांक.१ डिसेंबर २०१६ अन्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपद्धतीची सुधारित नियमपुस्तिकेतील परिच्छेद क्र.४.१ अन्वये ई-निविदा कार्य प्रणालीचा अवलंब करुन जाहिर टेंडर नोटीस **http:// amc. maharashtra.etenders.in** या वेबसाईटवर प्रसिध्द करुन ई-निविदा मागविल्या असता मुदतीत -

१)क्रिश एंन्ट्राट्रेड प्रा.लि.,औरंगाबाद

२)अभय ट्रेडर्स,औरंगाबाद

३)युनिव्हर्सल ट्रेडलिंक,अहमदनगर

अशा एकूण तीन (३) निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

सोबत जोडलेला निविदा दराचा तुलनात्मक तक्ता पाहता - अ.नं.१ ते १८ चे दर युनिव्हर्सल ट्रेडलिंक,अहमदनगर यांचे स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम प्राप्त झालेले आहेत. जा.क्र.स्टोअर विभाग-१६३ दि.२८/०८/२०१७ अन्वये युनिव्हर्सल ट्रेडलिंक,अहमदनगर यांना जीएसटी अंमलबजावणीनंतर शासकीय कंत्राटात होणारा बदलाबाबत महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांकःजीएसटी-१०१७/प्र.क्र.८१/कराधान-१ दि.१९ ऑगस्ट २०१७ चे परिपत्रकान्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार निविदा दर वाटाघाटीसाठी दि.२९/०८/२०१७ रोजी सकाळी ११=३० वाजता मा.प्रशासकिय खरेदी समितीसमोर उपस्थित राहणेबाबत कळविले असता ते समक्ष उपस्थित राहून झालेल्या चर्चेनुसार निविदाकाराने निगोसिएशननंतर कमी करुन दिलेले दर सर्व करासहित स्टोअर पोहोच पुरवठा करण्यासह असल्याचे मान्य करुन तसे लेखी संमतीपत्र दिलेले असून कॉलम क्र.४ मध्ये नमुद अ.नं.१ ते १८ चे दर मंजुरीस तसेच जरुरीप्रमाणे संबंधित विभागाच्या मागणी प्रस्तावाप्रमाणे व उपलब्ध अंदाजपत्रकिय तरतुदीनुसार खरेदी करण्यास व त्याकामी येणा-या खर्चास मंजुरी देणेबाबत शिफारस मा.प्रशासकिय खरेदी समितीमार्फत करण्यात आलेली आहे.

**<u>निविदाकार :- युनिव्हर्सल ट्रेडलिंक,अहमदनगर</u>**

| निविदेतील अ.नं. | मालाचा तपशील | निविदेमध्ये दिलेला दर | मा.प्रशासकिय खरेदी समितीने मंजुरी करिता शिफारस केलेले दर |
|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** |
| १) | लोखंडी खोरे नंबर ८ - नामांकित कंपनी | २२८=०० / १ नग | २१०=०० / १ नग |
| २) | लोखंडी टिकाव - नामांकित कंपनी | ३२२=०० / १ नग | ३००=०० / १ नग |

| | | | |
|---|---|---|---|
| ३) | लोखंडी कचरा ढकलगाडीची चाके<br>साईज - १२ इंच डायमिटर<br>जाडी १.५ इंच रबर टायरसह | १,०८०=०० / १ नग | ९५०=०० / १ नग |
| ४) | लोखंडी हातफावडी १६ गेज पत्र्याची<br>३/४ इंच व्यासाचे १० फुट लांब लोखंडी कॅन्डीयट पाईपच्या दांडयासह | ४१५=०० / १ नग | ४१०=०० / १ नग |
| ५) | डिस्पोजेल सेफ्टी मास्क | ७५=०० / १ नग | ६५=०० / १ नग |
| ६) | लोखंडी गज ४ आणे जाडी | ११५=०० / १ किलो | ६०=०० / १ किलो |
| ७) | गमबूट नामांकित कंपनीचे - १४" उंचीचे<br>नं. ७,८,९ | ६४०=०० / १ जोड | ६१०=०० / १ जोड |
| ८) | २२ इंची व्यासाचे फायबर घमेले अनब्रेकेबल<br>हेवी क्वॉलिटी | ४४०=०० / १ नग | ४२५=०० / १ नग |
| ९) | २० इंची व्यासाचे फायबर घमेले अनब्रेकेबल<br>हेवी क्वॉलिटी | ४००=०० / १ नग | ३४५=०० / १ नग |
| १०) | नारळी खराटे लांब जाड काडीचे<br>प्रत्येकी वजन ७५० ग्रॅम | ३८=०० / १ नग | ३२=०० / १ नग |
| ११) | लाईफबॉय साबण १२० ग्रॅम.वजनाचे | २९=०० / १ नग | २५=०० / १ नग |
| १२) | गॅल्व्हनाईज हात पत्रे २४ गेज गोठ मारलेले<br>साईज - लांबी १२ इंच व रुंदी ७ इंच | १४३=०० / १ जोड | १२५=०० / १ जोड |
| १३) | बांगडी पाईप २.१/२ इंच व्यासाचा<br>अँकर अथवा नामांकित कंपनीचा<br>१ बंडल x १०० फुट | ६,३७५=००<br>/ १ बंडल | ६,२००=००<br>/ १ बंडल |
| १४) | लोखंडी पहार ५ फुट लांब भरीव पोलाद | ५३५=०० / १ नग | ५३०=०० / १ नग |
| १५) | लोखंडी घन १० पौंड वजनाचा | ६७५=०० / १ नग | ६५०=०० / १ नग |
| १६) | लोखंडी दाताळे ६ फुट लांब १ फुट रुंदीचा पंजा | २००=०० / १ नग | १९०=०० / १ नग |
| १७) | Tarpaulin - Water proof<br>२५० GSM +_ ५%,<br>Cutsize - १२' x १५' | २,४६०=००/ १ नग | १,९००=०० / १ नग |
| १८) | **लोखंडी कचरा ढकलगाडी**<br>साईज-लांबी ३६",रुंदी २४",खोली १२",<br>एकूण गाडीची उंची २५"(जमिनीपासून),<br>एकूण गाडीची लांबी(हँडलसह) ५२",<br>चाकाची साईज-१२" बॉल बेअरींग सह<br>चाकासाठी १" x १" साईजचा चौरस भरीव बार,<br>बॉडी अँगल फ्रेम २५ x २५ x २ -१८ गेज गॅल्व्हनाईज पत्रा लावून संपुर्ण ढकलगाडी ऑईलपेंटने रंगवून पूर्ण दोन्ही बाजूस 'अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर' नाव टाकलेली | ९,९९९=००<br>/ १ नग | ७,४५०=००<br>/ १ नग |

संबंधित निविदाकार यांना जा.क्र.स्टोअर विभाग-२४७ दि.०२/११/२०१७ अन्वये निविदा डिपॉझिट रक्कम भरुन करारनामा करुन देणेबाबत कळविले असता त्यांनी निविदा डिपॉझिट रक्कम भरुन दि.०८/११/२०१७ रोजी संविदा पूर्ण केलेली आहे.

जा.क्र.स्टोअर विभाग-३८८ दि.१४/०२/२०१८ अन्वये नारळी खराटे या माला करिता जी.एस.टी.कर माफी झाल्याने मंजूर वार्षिक निविदा दरात जी.एस.टी.कराची आकारणी होणार नसल्याने कर आकारणी इतकी रक्कम दरामधून कमी करुन सुधारित दराबाबत लेखी संमतीपत्र देणेबाबत पुरवठादार

युनिव्हर्सल ट्रेडलिंक,अहमदनगर यांना कळविले असता त्यांनी ते मान्य करुन नारळी खराटेच्या दरात ५% जी.एस.टी.कराची रक्कम कमी करुन सुधारित दर रु.३०=४० प्रति १ नग याप्रमाणे दिलेला आहे.

सदर वार्षिक मंजूर निविदा दराने घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील मागणी प्रस्तावान्वये-

**१)** बांगडी पाईप- २ १/२ इंच व्यासाचा अँकर कंपनीचा - १०० फुट x १ बंडल - रु.६,२००/-

**२)** गमबुट - अरविंद कंपनीचे १४" उंचीचे नं.७,८,९ - १५० जोड - रु.९१,५००/-

**३)** लोखंडी हातफावडी १६ गेज पत्र्याची - ३/४ इंच व्यासाचे १० फुट लांब लोखंडी कँन्डीएट पाईपच्या दांडयासह - १०० नग - रु.४१,०००/-

**४)** लोखंडी कचरा ढकलगाडीची चाके - १२ इंच डायमिटर जाडी १.५ इंच रबर टायरसह - २०० नग - रु.१,९०,०००/-

**५)** २० इंची व्यासाचे फायबर घमेले - अनब्रेकेबल हेवी क्लॉलिटी - ५०० नग - रु.१,७२,५००/-

याप्रमाणे साहित्य खरेदी करण्यात आलेले असून

**६)** नारळी खराटे-लांब जाड काडीचे प्रत्येकी वजन ७५० ग्रॅम -४००० नग - रु.१,२१,६००/- फक्तचा मागणीपत्र क्र.८१७ दि.१४/०२/२०१८ अन्वये पुरवठा आदेश दिलेला आहे.

उपरोक्त साहित्य खरेदीस रक्कम रु.६,२२,८००=००फक्त(अक्षरी रक्कम रुपये.सहा लक्ष बावीस हजार आठशे फक्त)खर्च होत आहे.

सदर बाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड)अन्वये मा.स्थायी समिती सभेपुढे माहितीस्तव सादर करणेबाबत स्टोअर विभाग दि.२०/०२/२०१८. चे प्रस्तावावर -

मा.घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख यांनी सहमतीदर्शक स्वाक्षरी केलेली आहे.

मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी "प्र.स्टोअर वि.प्रमुख व घनकचरा व्यव.प्रमुख यांच्या प्रस्तावानुसार 'अ' प्रमाणे कार्यवाही करणे बाबत उचित निर्णयास्तव"

मा.उपायुक्त(कर)यांनी सहमतीदर्शक स्वाक्षरी केलेली आहे.

मा.अतिरिक्त आयुक्तसाहेब यांनी "उपरोक्त अहवालामधील 'अ' प्रमाणे मान्यतेस्तव सादर" असा अभिप्राय नमुद करुन स्वाक्षरी केलेली आहे.

मा.आयुक्तसाहेब यांनी सहमतीदर्शक स्वाक्षरी केलेली आहे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- विषयाचे वाचन करण्यात यावे.

मागील सभेच्या इतिवृत्ताचे वाचन सुरू करण्यात आले.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- एक एका इतिवृत्त वाचा प्रत्येक विषयावर आम्हाला चर्चा करावयाची आहे.मागील इतीवृत्त अदयाप कायम का झाले नाही ? सभेमध्ये जबाबदार अधिकारी पाहिजे.मा.आयुक्त यांना सभेमध्ये बोलवा.दोन्ही प्रभारी उपायुक्त हे जबाबदार अधिकारी होवू शकत नाही.

मा.श्री.संजय शेंडगे :- सभेमध्ये दोन उपायुक्त आहेत सभा सुरू करण्यात यावी.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- दोनही उपायुक्त हे प्रभारी आहेत आयुक्तांना बोलवा

मा.श्री.मुदस्सर शेख :- मागील इतीवृत्त कायम केले नाही.मा.आयुक्तांना बोलवा.जबाबदार अधिकारी पाहिजेत.इतीवृत्त कायम का केले नाही ? या बाबतचे नियम सांगा.

मा.नगरसचिव श्री.तडवी :- इतीवृत्त कायम करण्याच्या विषयाबाबत वेळोवेळी मा.नगरसचिव यांचेकडेस प्राप्त झालेले विषय व इतिवृत्त कायम करणे बाबत चे सर्व विषय मा.सभापती तथा पिठासीन अधिकारी यांच्या कडे सादर केले जातात.त्यानुसार सभापती यादी मधील विषय निर्णय घेणे कामी सभेचे तारीख व वेळ देवून स्थायी समिती सभा काढणे बाबत आदेशीत करतात.इतिवृत्ता बाबत वेळोवेळी यादी दिलेली आहे.सदरचे विषय पिठासीन अधिकारी यांनी न घेतल्याने प्रलंबित आहेत.

मा.श्री.सागर बोरूडे :- सगळे विषय मंजूर करण्यात यावे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- असे विषय मंजूर होत नाहीत.विषय वाचल्यानंतर त्यावर चर्चा होईल,कुठलीही चर्चा न होता विषय मंजूर होत नाहीत.चर्चा न होता विषय कसे काय मंजूर होतात.

मा.सभापती साहेब :- बहुमताने सर्व विषय मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सन२०१७-२०१८ या आर्थिक वर्षाकरिता अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी लागणारे हार्डवेअर साहित्य खरेदी करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये माहितीबाबतच्या ऑफिस रिपोर्टाचे अवलोकन झाले आहे.

मा.सदस्य.१) श्री.बाळासाहेब बोराटे २) मा.श्री.मुदस्सर शेख ३) मा.श्री.संजय लोंढे या सदस्यांचा विरोध नोंदवून घेण्यात येत आहे.सभागृहात सभेस उपस्थितीत १२ सदस्यांपैकी ९ अनुकुल व ३ विरुध्द अशा बहुमताने ऑफिस रिपोर्ट मंजूर.नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.संजय शेंडगे सही /-

अनुमोदक :- मा.सौ.उषा नलवडे सही /-

ठराव बहुमताने मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०१**

विषय क्रमांक- ४ गुरूवार दि.२६/०४/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** मा. केंद्रशासित 'अमृत' योजना अभियाना अंतर्गत भुयारी गटार योजना ई - निविदा क्र.१६५४ चे व्यापारी लिफाफया मधील प्राप्त दर व ठेकेदाराचे वाटाघाटी नंतरचे अंतीम देकाराबबत महाराष्ट्र जीवन प्राधिकारणाचे प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका पाणीपुरवठा विभाग

संदर्भ :१) पा.पु. जा.क्र. १२९९ दि. ०९/०२/२०१८ चे पत्र
२)मुख्य अभियंता,म.जी.प्रा.नाशिक यांचे जा.क्र.मुअ/नाशिक/लेखा/निविदा/४०९दि.१३/०३/२०१८चे पत्र
३) पा.पु. जा.क्र. १४७९ दि. १७/०३/२०१८ चे पत्र
४) मा.अधिक्षक अभियंता यांचेकडील जा.क्र.५१५दि.२३/०३/२०१८चे पत्र मा.छाननी समितीची बैठक
५)मुख्य अभियंता,म.जी.प्रा.नाशिक यांचेजा.क्र.मुअ/नाशिक /लेखा/निविदा/५०६दि.२६/३/२०१८चे पत्र
६) दि. २८/०३/२०१८ रोजीची छाननी समिती
७) मे. ड्रिम कन्स्ट्रक्शन यांचे दि. २८/०३/२०१८ चे पत्र
८) पा.पु. जा.क्र. २ दि. ०२/०४/२०१८ चे पत्र
९)मुख्य अभियंता,म.जी.प्रा.नाशिक यांचे जा.क्र.मुअ/नाशिक /लेखा/निविदा/८७०दि.०३/४/२०१८चे पत्र
१०) पा.पु. जा.क्र. ९ दि. ०४/०४/२०१८ चे पत्र
११)मुख्यअभियंता,म.जी.प्रा.नाशिक यांचे जा.क्र.मुअ/नाशिक /लेखा/निविदा/६३०दि.०६/४/२०१८चे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट सादर की, "अमृत " अभियाना अंतर्गत शहर भुयारी गटार योजनेची ई निविदा क्र. १६५४ अहमदनगर महानगरपालिकेमार्फत प्रसिध्द करण्यात आलेली होती.

सदर निविदेसाठी मा. मुख्य अभियंता, म.जी.प्रा. यांचे सुचनेनुसार दोनही निविदाधारक यांचा वित्तीय लिफाफा उघडण्यात आला. त्यांचे वित्तीय लिफाफयामधील कागदपत्रे तपासणीसाठी म.जी.प्रा. कडे पाठविण्यात आली. तद्नंतर म.जी.प्रा. चे सुचनेनुसार त्यांचेशी दि. २८/०३/२०१८ रोजी मा.आयुक्त यांचे दालनात व त्यांचे अध्यक्षतेखाली वाटाघाटी करण्यात आली. यावेळी म.जी.प्रा. चे कार्यकारी अभियंता, उपअभियंता, शाखा अभियंता इत्यादी उपस्थित होते. मे. ड्रिम कन्स्ट्रक्शन, नंदुरबार यांनी वाटाघाटीच्या वेळेस पत्र देवून ३ % जादा देकार हा योग्य असून त्या दरानेच काम करणार असल्याचे कळविले.

मे.ड्रिम कन्स्ट्रक्शन, नंदुरबार यांनी दि. २८/०३/२०१८ चे पत्रामध्ये उपस्थित केलेले मुद्दे व त्यांचा अंतीम देकार याबाबत स्पष्ट अभिप्राय देणे करिता संदर्भिय पत्र क्र. ८ नुसार मा. कार्यकारी अभियंता यांना कळविण्यात आले. मा. कार्यकारी अभियंता यांचे संदर्भिय पत्र क्र. ९ इकडेस प्राप्त झाले यापूर्वीच्या मुल्यांकन अहवालामध्ये दुरूस्ती केली. व उचित निर्णयासाठी म.न.पा. कडे पुनश्च संदर्भिय पत्र क्र. १० अन्वये सादर करण्यात आले.

संदर्भिय पत्र क्र. १० चे अनुषंगाने मा. मुख्य अभियंता, म.जी.प्रा नाशिक यांचे संदर्भिय पत्र क्र. ११ म.न.पा.स प्राप्त झाले असून खालीलप्रमाणे सुधारीत अहवाल सादर केलेला आहे.

| अ. न. | तपशिल | |
|---|---|---|
| १ | निविदेतील कामाची अंदाजित किंमत<br>(सन २०१५-२०१६ च्या दरसुची नुसार) | रू. १,२४,३८,०७,०८६/- |
| २ | चालू दरसुची नुसार निविदेतील कामाची किंमत | रू. १,२५,९१,५३,७१६/- |
| ३ | संभाव्य दरसुचीतील वाढ (शासन निर्णयामध्ये उल्लेख असल्यास )<br>(परिशिष्ट - ४) | -- |

| | | |
|---|---|---|
| ४ | शासन निर्णय क्र. बीसी.ए - २००९/ प्र.क्र.१०८/ कामगार - ७ अ, दि. १७/०६/२०१० अन्वये विचारात घ्यावयाच्या १% कामगार कल्याण उपकरासाठीची तरतूद (परिशिष्ट ५ नुसार) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुचीमधील दर वगळता | -- |
| ५ | शासन परिपत्रक क्र.डी.एस. आर.१०९० / सी.आर.६४५३ / पीएलएन३, दि.१४/०७/१९९३ अन्वये विचारात घ्यावयाच्या १% लेबर ॲमेनिटीजसाठीची तरतूद<br>(परिशिष्ट ५ नुसार ) | -- |
| ६ | चालू दरसुची सन २०१६-२०१७ नुसार निविदेतील कामाची एकूण मुल्यांकित किंमत (२+३+४+५) | रू. १,२५,९१,५३,७१६/- |
| ७ | ठेकेदाराच्या महापालिका स्तरावर वाटाघाटी नुसार अंतीम देकाराची किंमत ३.०० % जास्त दर | रू.१,२८,११,२१,२९९/- |
| ८ | एकूण मुल्यांकित किंमतीवर ठेकेदाराच्या सुधारीत देकाराची तुलना<br>(१,२८,११,२१,२९९ (- ) १,२५,९१,५३,७१६) x १००<br>१,२५,९१,५३,७१६ | **१.७५ % जादा दराने** |

वरील आर्थिक मुल्यांकनाचा विचार करता मे. ड्रिम कन्स्ट्रक्शन, नंदुरबार यांनी सादर केलेल्या देकाराची (निविदेच्या अंदाजित किंमतीपेक्षा ३.००% जादा दराने) सन २०१६-२०१७ च्या मुल्यांकित किंमतीशी तुलना करता मुल्याकित किंमतीवर (रू. १,२५,९१,५३,७१६/-)वर १.७५ % जादा दराने असा येत आहे.

या कामासाठी अद्याप पर्यंत मुळ कालावधीसह २ वेळा निविदा बोलविण्यात आलेल्या आहेत. दुस-या मुदतवाढी अंती मे. ड्रिम कन्स्ट्रक्शन, नंदुरबार यांनी सादर केलेला देकार ३.०० % जादा दराने आहे. मे. ड्रिम कन्स्ट्रक्शन, नंदुरबार यांना अहमदनगर महानगरपालिकेमध्ये दरांच्या वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असल्याचे पत्रव्यवहारातून दिसून येत आहे. यावर कंत्राटदाराने त्यांचे पत्र दि. २८/०३/२०१८ नुसार देकार कमी करण्यास नकार दिलेला आहे असे निदर्शनास येत आहे.

मे.ड्रिम कन्स्ट्रक्शन,नंदुरबार यांनी सादर केलेला देकार अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा ३.००%जादा दराने व चालू दरसुचीच्या मुल्यांकित किंमतीशी तुलना केली असता१.७५%जादा दराने आहे. तो रास्त आहे.असे या कार्यालयाचे मत आहे.तथापी निविदा स्विकारणेबाबतचा अंतीम निर्णय हा अ.नगर महानगरपालिकेचा राहिल.

योजनेची मंजूर किंमत रू. १३१.०० कोटी आहे. ठेकेदाराच्या देकारानुसार व मंजूर योजनेत समाविष्ठ परंतू निविदेत समाविष्ट नसलेल्या बाबींचा एकूण खर्च लक्षात घेता योजनेवर अपेक्षित खर्च हा रू. ३.३१ कोटी एवढा येत आहे. त्यामुळे ही वाढीव रक्कम अहमदनगर महानगरपालिकेला स्वतःच्या निधीमधून उभारावी लागेल. यासाठी शासनाकडून मंजूर योजनेच्या किंमती व्यतिरिक्त कुठल्याही निधी उपलब्ध होत नाही. "

अहमदनगर शहर भुयारी गटार योजनेच्या निविदेच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे बाबी निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

१) योजनेचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी निविदा स्विकृत/ अस्विकृत विषयक शिफारस करणे आवश्यक होते.परंतू तसे न करता मे.ड्रिम कन्स्ट्रक्शन,नंदुरबार यांनी सादर केलेला देकार अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा ३.००%जादा दराने व चालू दरसुचीच्या मुल्यांकित किंमतीशी तुलना केली असता १.७५%जादा दराने आहे.तो रास्त आहे.असे नमूद केले आहे.

२) यापूर्वी 'अमृत ' अभियाना अंतर्गत पाणी पुरवठा विषयक कामाचा निविदेच्या अनुषंगाने मा. सदस्य सचिव, म.जी.प्रा. एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई यांचे पत्रानुसार म.जी.प्रा. चे अभिप्रायानुसार सदर निविदे संदर्भात राज्यस्तरीय निविदा समितीच्या बैठकीत निर्णय होणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार पाणी पुरवठा विषयक कामाची निविदा स्विकृत करणे विषयीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीमध्ये सादर करून तद्नंतर अंतीम मान्यतेसाठी

मा. शासनाच्या राज्यस्तरीय तांत्रिक समितीकडे पाठविण्यात आला होता. यानुसारच भुयारी गटार योजनेच्या कामाची निविदा स्विकृती बाबतच्या निर्णयासाठी मा. स्थायी समितीकडे पाठवून पुढील मंजूरीसाठी मा. शासनाच्या राज्यस्तरीय तांत्रिक समितीकडे पाठविणे आवश्यक आहे.

३) मा.मुख्य अभियंता यांचे संदर्भिय पत्र क्र.११ अन्वये प्राप्त अहवाला नुसार मे.ड्रिम कन्स्ट्रक्शन यांनी सादर केलेला देकार अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ३.००%जादा व चालू दरसुची नुसार१.७५% दराने म्हणजेच रूपये १,२८,९१,२१,२९९/-ही येणारी किंमत रास्त असल्याचे नमूद केले आहे. परंतू त्यानुसार सदर निविदेस रू.३.३१ कोटी इतका जास्तीचा खर्च येणार आहे.सदरचा निधी मनपास अतिरिक्त उभारावा लागणार असून मनपाच्या ठरावाची आवश्यकता आहे.यासाठी मा.स्थायी समिती मंजूरी घेणे गरजेचे आहे तसेच ठेकेदाराचा अंतीम देकार अंदाजित किंमतीपेक्षा जास्त असल्याने यासंदर्भात राज्यस्तरीय निविदा समितीच्या बैठकीत निर्णय होणे आवश्यक आहे.

ई निविदा क्र. १६५४ च्या अनुषंगाने वरीलप्रमाणे नमूद ३ मुद्यांच्या अनुषंगाने अंतीम निर्णय होणे आवश्यक आहे. तथापी आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणेप्रमाणे कनिष्ठ अभियंता यांचा रिपोर्ट असे.

यावर मा.विभाग प्रमुख (अमृत अभियान) यांचा अभिप्राय की, अहवालानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.मुख्य लेखा अधिकारी यांचा निरंक

यावर मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचे पत्र क्र. ६३० दि. ०६/०४/२०१८ नुसार वाढीव कामाचे रक्कम रू. ३.३१ कोटी अतिरिक्त खर्च हया म.न.पा. निधीतून करावा लागणार असल्याने सदरच्या ३.००% जादा दराच्या निविदे बाबत होणा-या अतिरिक्त खर्च म.न.पा. निधीतूनच करावा लागत असल्याने मा. मुख्यलेखाधिकारी यांचे अभिप्राय घेणे उचित राहिल. नस्तीमध्ये मा. मु.ले.अ. यांचे अभिप्राय नाहीत.

वाढीव ३.०० % जादा निविदे बाबत वाटाघाटी करून मुळ अंदाजपत्रकीय दराने निविदा स्विकृती बाबत मा. स्थायी समिती/ मा. महासभा यांची मान्यता घेणे उचित राहिल.

यावर मा.उपायुक्त (सा.)यांचा अभिप्राय की,मा. मु.ले.प. यांचे प्रस्तावानुसार मान्यतेस्तव.

यावर मा.अतिरिक्त आयुक्त यांची अभिप्राय की, सोबतच्या अहवालामधील संदर्भाधीन अनुक्रमांक १ ते ११ अन्वये तसेच म.न.पा. ची आर्थिक स्थिती पाहता जादा दराची निविदा शिफारस, न विचारात घेता अंदाजपत्रकीय दराने मान्यता देणे उचित होईल. तथापी धोरणात्मक निर्णयाकरिता सादर.

यावर मा. आयुक्त साहेब यांची अभिप्राय की,मा. स्थायी समितीकडे प्रस्ताव पाठवावा.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- विषयाचे वाचन करण्यात यावे.

मागील सभेच्या इतिवृत्ताचे वाचन सुरू करण्यात आले.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- एक एका इतिवृत्त वाचा प्रत्येक विषयावर आम्हाला चर्चा करावयाची आहे.मागील इतीवृत्त अदयाप कायम का झाले नाही? सभेमध्ये जबाबदार अधिकारी पाहिजे.मा.आयुक्त यांना सभेमध्ये बोलवा.दोन्ही प्रभारी उपायुक्त हे जबाबदार अधिकारी होवू शकत नाही.

मा.श्री.संजय शेंडगे :- सभेमध्ये दोन उपायुक्त आहेत सभा सुरू करण्यात यावी.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- दोनही उपायुक्त हे प्रभारी आहेत आयुक्तांना बोलवा

मा.श्री.मुदस्सर शेख :- मागील इतीवृत्त कायम केले नाही.मा.आयुक्तांना बोलवा.जबाबदार अधिकारी पाहिजेत.इतीवृत्त कायम का केले नाही ? या बाबतचे नियम सांगा.

मा.नगरसचिव श्री.तडवी :- इतीवृत्त कायम करण्याच्या विषयाबाबत वेळोवेळी मा.नगरसचिव यांचेकडेस प्राप्त झालेले विषय व इतिवृत्त कायम करणे बाबत चे सर्व विषय मा.सभापती तथा पिठासीन अधिकारी यांच्या कडे सादर केले जातात.त्यानुसार सभापती यादी मधील विषय निर्णय घेणे कामी सभेचे तारीख व वेळ देवून स्थायी समिती सभा काढणे बाबत आदेशीत करतात.इतिवृत्ता बाबत वेळोवेळी यादी दिलेली आहे.सदरचे विषय पिठासीन अधिकारी यांनी न घेतल्याने प्रलंबित आहेत.

मा.श्री.सागर बोरूडे :- सगळे विषय मंजूर करण्यात यावे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- असे विषय मंजूर होत नाहीत.विषय वाचल्यानंतर त्यावर चर्चा होईल,कुठलीही चर्चा न होता विषय मंजूर होत नाहीत.चर्चा न होता विषय कसे काय मंजूर होतात.

मा.सभापती साहेब :- बहुमताने सर्व विषय मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** मा.केंद्रशासित 'अमृत' अभियानाअंतर्गत भुयारी गटार योजना विषयक काम ई - निविदा क्र.१६५४ चे व्यापारी लिफाफया मधील प्राप्त दर व त्यांचेशी वाटाघाटीनंतर दिलेले दर व मा. छाननी समिती मध्ये मे.ड्रिम कन्स्ट्रक्शन,नंदुरबार यांनी ३.०० % पेक्षा कमी दराने काम करणार नसल्याचे पत्र दिल्याप्रमाणे निविदे बाबतच्या म.जी.प्रा.च्या अहवालामध्ये केलेल्या शिफारसी नुसार मे.ड्रिम कन्स्ट्रक्शन,नंदुरबार यांनी ३.०० % जादा दराने व चालू दरसुचीच्या मृल्यांकित किंमतीशी तुलना केली असता १.७५% जादा दराने सादर केलेल्या अंतीम देकाराच्या निविदेच्या रकमेस ही सभा मान्यता देत आहे.

म.जी.प्रा.चे प्राप्त अहवाला नुसार सदर निविदेस रूपये ३.३१ कोटी इतका जास्तीचा खर्च येणार आहे. सदरचा निधी म.न.पा.स अतिरिक्त उभारावा लागणार असून वाढीव निधी करीता मा.राज्य शासनाकडे तात्काळ प्रस्ताव सादर करून निधी उपलब्ध करून घ्यावा.नगरवासयींकरीता अत्यंत महत्वकांक्षी योजना असून ही योजना पुर्णत्वास नेणे अत्यंत आवश्यक असल्याने महानगरपालिकेने अन्य उपलब्ध असलेल्या उचित निधीतुन खर्च करण्यात यावा किंवा मनपा फंडातुन हा वाढीव खर्च करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

सदरचा प्रस्ताव म.जी.प्रा.यांचे प्राप्त अभिप्रायानुसार सदर निविदे संदर्भात राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या बैठकीत निर्णय होणे आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव तात्काळ राज्यस्तरीय तांत्रिक समितीकडे पाठविण्यास ही सभा मान्यता देत आहे.

मा.सदस्य.१) श्री.बाळासाहेब बोराटे २) मा.श्री.मुदस्सर शेख ३) मा.श्री.संजय लोंढे या सदस्यांचा विरोध नोंदवून घेण्यात येत आहे.

सभागृहात सभेस उपस्थितीत १२ सदस्यांपैकी ९ अनुकुल व ३ विरुध्द अशा बहुमताने ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.संजय शेंडगे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.बाबासाहेब वाकळे सही/-

ठराव बहुमताने मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०१**

विषय क्रमांक- ५ गुरूवार दि.२६/०४/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** मालमत्ता धारक श्री. विवेक रामलिंग आकुबत्तीन , रा. हौसीग सोसायटी यांना सावेडी प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.७८,बील क्र.१८४ मालमत्तेमध्ये नळजोड नसल्याने नळजोड पोटी आकारलेली पाणीपटटी कराची नळ कनेक्शन नसतांना आकरण्यांत आलेली रक्कम व शास्ती निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सावेडी प्रभाग समिती क्र.१

मालमत्ता कर वसुली वॉर्ड क्र.७८ चे वसुली मदतनीस श्री.गोरख ठुबे यांजकडुन विनंती रिपोर्टदेण्यात येतो की,मालमत्ता कर वसुली वॉर्डक्र.७८ मधील अनुक्रमांक १८४ वर अशियाना रो हौसींग सोसायटी सावेडी याठिकाणी असलेल्या मालमत्तेचे मालमत्ताधारक श्री.विविक रामलिंग आकुबत्तीन यांनी दि.१२/३/२०१६ रोजी अर्ज देवून नळ कनेक्शन नसताना आकारलेली नळ पट्टी कमी करणेबाबत विनंती केलेली आहे.

अर्जदार श्री.विविक रालिंग आकुबत्तीन यांच्या व दिनांक १२/३/२०१६ च्या विनंती अर्जावरून पाणीपुरवठा फिटर यांचेमार्फत सदर जागेची स्थळ पहाणी करून नळ जोड आहे किंवा नाही याबाबतचा अहवाल सादर करणेबाबत कळविले असता पाणीपुरवठा फिटर यांनी दिनांक २३/६/२०१७ रोजी समक्ष पाहणी केली असता सदरील घरांवर नळ कनेक्शन आढळुन येत नाही.असाबाबतचा अहवाल सादर केलेला आहे.

तसेच सन २०१७-१८ च्या मालमत्ता कराच्या बिल क्रमांक ५१६६२ दिनांक ३/४/२०१७ देयकामी पडताळणी केली असता सदरच्या देयकामध्ये थकबाकी पोटी २१०००/-व चालु मागणीपोटी रू.१५००/- दर्शविलेली असून आज दिनांक ६/७/२०१७ रोजी पाणीपट्टी व शास्तीची संगणकावर देयकाची पडताळणी केली असता एकुण थकबाकी रू.८१६०६/- दर्शविलेली असुन दंडापोटी ३० जुलै २०१७ अखेरीस एकुण ५९,१०६/- शास्ती दर्शविलेली आहे.

तरी पाणीपुरवठ फिटर यांचे दिनांक २३/६/२०१७ चा समक्ष स्थळ पहाणी अहवालानुसार सदरच्या मालमत्तेमध्ये नळजोड नसल्याने नळजोड पोटी आकारलेली पाणीपट्टी कराची रक्कम रूपये २२,५००/- व दंडापोटी आकारण्यात आलेली रक्कम रू.५९,१०६ अशी एकुण ८१,६०६ /- ही वसुल होण्याजोगी नसल्याने सदरची रक्कम निर्लेखित करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुची ड कराधान नियम १५२ नुसार मालमत्ताधारक यांना दुरूस्त देयक देणेबाबत अहवाल सविनय सादर.

येणे प्रमाणे वसुली मदतनीस यांचा अहवाल असे.

यावर वसुली अधिक्षक यांचा अभिप्राय की,सादर,वसुली मदतनीस यांनी सादर केलेल्या प्रस्तवानुसार तसेच मनपा फिटर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मालमत्ता धारक श्री.विवेक रामलिंगु आकुबत्तीन यांच्या कडे नळ कनेकशन नसतांनाही त्यांना पाणी पट्टीची कर आकारणी आकारण्यात येत असल्याने पाणी पट्टीचे थकबाकी कमी करणे उचित वाटते तथापी आदेशार्थ सादर.

यावर प्रभागअधिकारी प्र.स.क्र.१ याचा अभिप्राय की,कर लिपीक यांच्या अभिप्रायानुसार व मनपा नळ फिटर यांच्या पहाणी अहवालानुसार नळ कनेक्शन नोंद रद्द करणे उचित वाटते.

यावर रिव्हिजन विभाग प्रमुख यांचा अभिप्राया की,वॉर्ड क्र.८ मधील वसुली लिपीक व करनिरिक्षक यांनी दि.२३/६/२०१७ रोजी समक्ष स्थळ करून सादर केलेला अहवाल ,पाणी पुरवठा फीटर व प्रभाग अभियंता यांचा अहवाल व प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय व महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ मधील अनुसुची ड कराधाना नियम १५२ नुसार कार्यवाही करणे उचित वाटते.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अहवाल की,दिनांक १/४/२०१७ ते दि.३१/३/२०१८ अखेरचे कराचे बील क्र.५१६६२ दि.३/४/२०१७ अन्वये थकबाकीची रक्कम रूपये १,०८,७४९/- इतकी दर्शविलेली असून थकबाकी रक्कम जास्त असून संबंधितावार जबाबदारी निश्चित करून विभागाने उचित निर्णय घेणे योग्य राहिल.तसेच थकबाकी वसुलीबाबत विभागाने पाठपुरावा करून अश्या प्रकारणांची स्वतंत्र नोंदवही ठेवून वसुली १००% रणेबाबत दरमहा नियमीत आढावा घेणेत यावे.

यावर करनिरीक्षक यांचा अभिप्राय की,फेरसादर मालमत्ता धारक यांच्या कडे नळजोड नसल्या कारणाने इतर कराची रक्कम अदा केलेली नाही.नळजोड पाटी असलेली थकबाकी व त्यावरील शास्तीची रक्कम रूपये २२५००/-+शास्तीची रक्कम कमी केल्यास मालमत्ता धारक इतर थकबाकी भरण्यास तयार आहेत.

यावर प्रभाग अधिकारी यांची स्वाक्षरी

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, अ नुसार मान्यतेस्तव सादर व तसेच नळ कनेक्शन नसतांना आकारण्यात आलेली रक्कम व शास्ती निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समिती सभेपुढे ठेवणे उचित होईल.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- विषयाचे वाचन करण्यात यावे.

मागील सभेच्या इतिवृत्ताचे वाचन सुरू करण्यात आले.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- एक एका इतिवृत्त वाचा प्रत्येक विषयावर आम्हाला चर्चा करावयाची आहे.मागील इतीवृत्त अदयाप कायम का झाले नाही? सभेमध्ये जबाबदार अधिकारी पाहिजे.मा.आयुक्त यांना सभेमध्ये बोलवा.दोन्ही प्रभारी उपायुक्त हे जबाबदार अधिकारी होवू शकत नाही.

मा.श्री.संजय शेंडगे :- सभेमध्ये दोन उपायुक्त आहेत सभा सुरू करण्यात यावी.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- दोनही उपायुक्त हे प्रभारी आहेत आयुक्तांना बोलवा

मा.श्री.मुदस्सर शेख :- मागील इतीवृत्त कायम केले नाही.मा.आयुक्तांना बोलवा.जबाबदार अधिकारी पाहिजेत.इतीवृत्त कायम का केले नाही ? या बाबतचे नियम सांगा.

मा.नगरसचिव श्री.तडवी :- इतीवृत्त कायम करण्याच्या विषयाबाबत वेळोवेळी मा.नगरसचिव यांचेकडेस प्राप्त झालेले विषय व इतिवृत्त कायम करणे बाबत चे सर्व विषय मा.सभापती तथा पिठासीन अधिकारी यांच्या कडे सादर केले जातात.त्यानुसार सभापती यादी मधील विषय निर्णय घेणे कामी सभेचे तारीख व वेळ देवून स्थायी समिती सभा काढणे बाबत आदेशीत करतात.इतिवृत्ता बाबत वेळोवेळी यादी दिलेली आहे.सदरचे विषय पिठासीन अधिकारी यांनी न घेतल्याने प्रलंबित आहेत.

मा.श्री.सागर बोरूडे :- सगळे विषय मंजूर करण्यात यावे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- असे विषय मंजूर होत नाहीत.विषय वाचल्यानंतर त्यावर चर्चा होईल,कुठलीही चर्चा न होता विषय मंजूर होत नाहीत.चर्चा न होता विषय कसे काय मंजूर होतात.

मा.सभापती साहेब :- बहुमताने सर्व विषय मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार मालमत्ता धारक श्री. विवेक रामलिंग आकुबत्तीन , रा. हौसीग सोसायटी यांना सावेडी प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.७८,बील क्र.१८४ मालमत्तेमध्ये नळजोड नसल्याने नळजोड पोटी आकारलेली पाणीपटटी कराची नळ कनेक्शन नसतांना आकरण्यांत आलेली रक्कम व शास्ती निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्टास ही सभा मान्यता देत आहे आणि शास्ती निर्लेखीत करण्याची बाब स्थायी समितीच्या कक्षेत नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

मा.सदस्य.१) श्री.बाळासाहेब बोराटे २) मा.श्री.मुदस्सर शेख ३) मा.श्री.संजय लोंढे या सदस्यांचा विरोध नोंदवून घेण्यात येत आहे.

सभागृहात सभेस उपस्थितीत १२ सदस्यांपैकी ९ अनुकुल व ३ विरुध्द अशा बहुमताने ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.संजय शेंडगे सही /-

अनुमोदक :- मा.सौ.अनिता राठोड सही /-

ठराव बहुमताने मंजूर

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका